# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः23.07.2024** **वारःमंगळवार**

---

१. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन आज 2024-25 या वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर करणार
२. यंदाचा अर्थसंकल्प देशाच्या पुढच्या पाच वर्षांची दिशा ठरवणारा असेल, पंतप्रधानांचं प्रतिपादन
३. भारताचे ऑलिंपिक सुवर्णपदक विजेते अभिनव बिंद्रा यांना “ऑलिंपिक ऑर्डर” हा बहुमान जाहीर
आणि
४. आशिया चषक महिला क्रिकेट स्पर्धेमध्ये आज भारतीय संघाची नेपाळशी लढत आणि
५. कोकण आणि मध्य महाराष्ट्रासह देशाच्या विविध भागात येत्या दोन दिवसात अतिमुसळधार पावसाचा हवामान विभागाचा इशारा

**<u>अर्थसंकल्प</u>**
संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन कालपासून सुरू झालं. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन आज 2024-25 या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळातील हा पहिलाच अर्थसंकल्प असेल; आणि निर्मला सीतारमन सातव्यांदा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करतील. तत्पूर्वी काल अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी 2023-24 या वर्षाचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल लोकसभेत सादर केला. यंदाच्या म्हणजे 2024-25 या आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर साडेसहा ते सात टक्के राहण्याचा अंदाज यात व्यक्त करण्यात आला आहे. जागतिक स्तरावर आर्थिक क्षेत्रात अनिश्चितता असतानाही देशांतर्गत उत्पादन वाढीला चालना देणाऱ्या घटकांमुळे गेल्या आर्थिक वर्षामध्येआर्थिक वाढीला मदत मिळाली असल्याचं या अहवालात म्हटलं आहे. देशाच्या विकासात सेवा क्षेत्राचं महत्त्वाचं योगदान असून 2024 मध्ये अर्थव्यवस्थेच्या विकासात सुमारे 55 टक्के वाटा सेवा क्षेत्राचा होता, असं यात नमूद करण्यात आलं आहे.

तसंच उत्पादन आणि सेवा क्षेत्रातील निर्यातीमध्ये वाढ होण्याचा अंदाजही या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. रिझर्व्ह बँकेनं २०२५ या वर्षासाठी चलन फुगवट्याचा दर साडेचार टक्के आणि २०२६साठी हाच दर ४ पूर्णांक १ दशांश टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

**<u>पंतप्रधान</u>**
संसदेत सादर होणारा यंदाचा अर्थसंकल्प देशाच्या पुढच्या पाच वर्षांची दिशा ठरवणारा असेल; 2047 मध्ये विकसीत भारताचं स्वप्न पूर्ण करण्यासाठीचा पाया या अर्थसंकल्पातून घातला जाईल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला आहे. अधिवेशन सुरू होण्यापूर्वी त्यांनी संसद भवन परिसरात माध्यमांशी संवाद साधला. हे अधिवेशन सकारात्मक आणि सृजनात्मक व्हावं अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

**<u>आर्थिक सर्वेक्षण</u>**
चालू आर्थिक वर्षात सकल देशांतर्गत उत्पादन अर्थात जीडीपी वाढीचा दर साडेसहा ते सात टक्के राहण्याचा अंदाज लोकसभेत काल सादर झालेल्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात वर्तवण्यात आला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेसाठी ही अत्यंत आशादायक बाब आहे, असं ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रीज अर्थात एआयएआय नं म्हटलं आहे. या सर्वेक्षणात सूक्ष्म, लघु आणि मध्यम

उद्योग अर्थव्यवस्थेचा कणा असल्याचं म्हटलं  आहे. त्यामुळे या क्षेत्रातील नियंत्रणं कमी करण्यावर आणि डिजिटलायझेशनवर भर दिला आहे. आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी देशाच्या अमृत काळामध्ये प्रमुख्यानं सहा क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्यात आलं असून या क्षेत्रांसाठीच्या धोरणात आमूलाग्र बदल अपेक्षित आहेत. त्यामध्ये कृषी, एमएसएमई, खाजगी गुंतवणूक, हरित संक्रमण वित्तपुरवठा, शिक्षण-रोजगारातील दरी दूर करणं आणि सरकारी धोरणांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यांमध्ये पूर्ण क्षमता निर्माण करणं   या उद्दिष्टांचा समावेश आहे. आगामी काळात भारत हे जगातील वित्तीय सेवा केंद्र बनण्याची या सर्वेक्षणात  व्यक्त करण्यात आलेली अपेक्षा आनंददायक असल्याचं असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. विजय कलंत्री यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

<u>नीटलोकसभा</u>

लोकसभेतले विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी काल नीट युजी परीक्षा आणि स्पर्धा परीक्षा यंत्रणेबद्दलचा मुद्दा उपस्थित केला. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी त्यावर उत्तर दिलं. नीटची प्रश्नपत्रिका फुटण्याचा प्रकार केवळ पाटणा इथं झाल्याचं प्रधान यांनी सांगितलं. नीट परीक्षेतल्या गैरव्यवहाराची सीबीआय चौकशी करत आहे; हे प्रकरण सध्या न्यायालयात आहे. देशभरात ४ हजार ७०० केंद्रांवर नीट युजी परीक्षा घेण्यात आली. त्यातल्या एका केंद्रावरच अनियमतता झाल्याची नोंद आहे, असं प्रधान म्हणाले.

<u>नीट-न्यायालय</u>

नीट यूजी परीक्षेतील एका प्रश्नाच्या उत्तरासाठी दोंन पर्याय बरोबर म्हणून ग्राह्य धरण्याच्या एनटीएच्या निर्णयाबाबत आपलं मत मांडण्यासाठी दिल्ली आयआयटीनं तज्ज्ञांची समिती नेमावी असे आदेश सर्वोच्च न्यायालयानं काल दिले. या समितीनं आज दुपारी 12 पर्यंत आपला अहवाल सादर करावा असंही न्यायालयानं म्हटलं आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी आज होणार आहे.

<u>बांगलादेश</u> पीएम

सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षणाच्या विरोधात बांगलादेशातील विद्यार्थ्यांनी केलेल्या आंदोलनामुळे अलीकडेच देशभर उसळलेल्या हिंसाचाराला  आपले राजकीय विरोधक जबाबदार असल्याचा आरोप पंतप्रधान शेख हसीना यांनी केला आहे. राजधानी ढाका इथं काल उद्योग क्षेत्रातील अग्रणींना संबोधित करताना त्यांनी हा आरोप केला. परिस्थितीत सुधारणा झाल्यानंतर संचारबंदी उठवण्यात येईल असं त्यांनी यावेळी सांगितलं.
नागरिकांच्या जीविताचं आणि मालमत्तेचं रक्षण करण्यासाठी नाईलाजानं संचारबंदी लागू करणं भाग पडलं असल्याचंही त्या म्हणाल्या. सध्या देण्यात येत असलेलं बहुतांश आरक्षण रद्द करण्याचं बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयानं रविवारी मान्य केल्यानंतर शेख हसीना यांनी काल हे वक्तव्य केलं. रुग्णालयाच्या आकडेवारीनुसार,  बांगलादेशातील हिंसाचारात किमान १४७ नागरिकांना प्राण गमवावे लागले.

<u>अभिजातभाषा</u>

तामिळ, संस्कृत, कन्नड, तेलुगू, मल्याळम आणि ओडिया या सहा भारतीय भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आला आहे, अशी माहिती संस्कृती आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांनी काल लोकसभेत एका लेखी उत्तरात दिली. या अभिजात भाषांसह इतर सर्व भारतीय भाषांना प्रोत्साहन देण्यास सरकार वचनबद्ध आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्येही सर्व भारतीय भाषांना प्राधान्य देण्यात आलं आहे, असंही त्यांनी उत्तरात नमूद केलं आहे.

<u>अभिनवबिंद्रा</u>

ऑलिम्पिकमध्ये वैयक्तिक सुवर्णपदक पटकावणारे पहिले भारतीय क्रीडापटू अभिनव बिंद्रा यांना ऑलिम्पिक ऑर्डर हा बहुमान देऊन सन्मानित करण्याचा निर्णय आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीच्या कार्यकारी मंडळानं घेतला आहे. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये

येत्या १० ऑगस्ट रोजी बिंद्रा यांना हा बहुमान प्रदान करण्यात येणार आहे. बिंद्रा यांनी २००८च्या बीजिंग ऑलिम्पिकमध्ये नेमबाजीत पुरुषांच्या १० मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदक पटकावलं होतं.

**क्रिकेट**

आयसीसी विश्वचषक लीग 2 मधील पुरुषांच्या मर्यादित षटकांच्या क्रिकेट स्पर्धेमध्ये स्कॉटलंडचा वेगवान गोलंदाज चार्ली कॅसल यानं पदार्पणातच 21 धावांमध्ये 7 गडी बाद करत आत्तापर्यंतचे सर्व विक्रम मोडीत काढून नवा इतिहास रचला आहे. काल डंडी इथं झालेल्या ओमान विरुद्धच्या सामन्यात त्यानं पाच षटकं आणि चार चेंडूत 7 बळी घेतले आणि दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडाचा विक्रम मोडला. रबाडानं 2016मध्ये
बांगलादेशविरुद्धच्या त्याच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात 16 धावांत 6 बळी घेतले होते. रबाडाच्या व्यतिरिक्त वेस्ट इंडिजचा वेगवान गोलंदाज फिडेल एडवर्ड्सने 22 धावांत 6बळी घेतले होते.

**आशियाकप क्रिकेट**

श्रीलंकेतील डंबुला इथं सुरू असलेल्या आशिया चषक महिला क्रिकेट स्पर्धेमध्ये आज संध्याकाळी अ गटात भारतीय संघाची नेपाळशी लढत होणार आहे. सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी 07:00 वाजता सुरू होईल. आत्तापर्यंतच्या सामन्यांमध्ये एकदाही पराभूत न झालेला भारतीय संघ सध्या अ गटात गुणतालिकेत आघाडीवर आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील या महिला संघानं पाकिस्तान आणि संयुक्त अरब अमिरातीविरुद्धचे सामने जिंकले आहेत. नेपाळनं स्पर्धेतील सलामीच्या सामन्यात यूएईचा पराभव केला. मात्र, पुढच्या सामन्यात त्यांना पाकिस्तानकडून पराभव पत्करावा लागला. आज दुसऱ्या गटात पाकिस्तानची लढत संयुक्त अरब अमिराती बरोबर होणार आहे. काल झालेल्या ब गटातील लढतीत यजमानश्रीलंकेनं मलेशियाचा १४४ धावांनी पराभव केला. तर ब गटातील आणखी एका सामन्यात बांगलादेशनं थायलंडचा ७ गडी राखून पराभव केला.

**चीनपूर**

चीनच्या काही भागामध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली असून नैऋत्य सिचुआन प्रांतात पावसामुळे आलेल्या पुरात मरण पावलेल्यांची संख्या १४ झाली आहे. पुरात वाहून जात असलेले हे सर्व मृतदेह सापडले असून अद्यापही 25 लोक बेपत्ता आहेत. बचाव पथकातील कर्मचारी या लोकांचा कसून शोध घेतआहेत. शनिवारी पहाटे नदीला अचानक पूर आल्यामुळे सिन्हुआ गावामधील 40 हून अधिक घरांचंमोठं नुकसान झालं आहे.

**हवामान**

कोकण आणि मध्य महाराष्ट्र, तसंच गुजरात आणि गोव्यात येत्या दोन दिवसात अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. देशाच्या ईशान्य आणि उत्तरेकडील राज्यांमध्ये तसंच मध्य भागातही मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पंजाब, हरियाणा, चंडीगड आणि दिल्लीमध्ये वातावरण दमटपणा असेल असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.